सर्वोत्तमसंस्थेसाठीकॅनडायेथीलकॉमनवेल्थऑफलर्निंगच्याआंतरराष्ट्रीयगुणवत्तापुरस्कारानेसन्मानित

# यशवंतरावचव्हाणमहाराष्ट्रमुक्तविद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

गंगापूरधरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

दूरध्वनी : 0253-2231479. 2230580फॅक्स :2231716

संकेतस्थळ :http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

## परीक्षावनोंदणीविभाग

जा.क्र. : पनिका/नोंदणी/2016/ दिनांक :19.07.2016

## अत्यंत महत्वाचे
## प्रवेशार्थी विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना

शैक्षणिक सत्र 2016-17 वर्षासाठी आपण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेशघेण्यासाठी इच्छा व्यक्त केल्याबद्दल आपले प्रथमतः आभार !

विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयान्वये सर्व शिक्षणक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. ऑनलाईन प्रवेश करताना खालील बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे कि जेणेकरून आपल्या प्रवेशात येणाऱ्या अडचणी आपोआप दूर होतील व आपला प्रवेश सुकर होईल.

1. प्रथमतः विद्यापीठ संकेतस्थळhttp://ycmou.digitaluniversity.acवरभेट द्यावी.
2. आपणांस ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश करावयाचा आहे त्यासाठी विद्यापीठाच्या होमपेजवर Prospectus ह्या टॅबवर जाऊन विविध विद्याशाखानिहाय माहितीपुस्तिका उपलब्ध आहेत. माहितीपुस्तिकेतील आवश्यक तेवढी माहिती (उदा. शिक्षणक्रम प्रवेश पात्रता, कालावधी, शुल्क, अभ्यासक्रम निवड निश्चिती, मूल्यमापन इत्यादी) वाचन करावी व आपल्या संदर्भासाठी प्रिंट काढून घ्यावी.
3. आपणांस ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश करावयाचा आहे त्यासाठी विद्यापीठाच्या होमपेजवर Study Centers ह्या टॅबवर जाऊन आपल्या आवडीनुसार शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्र सूची आपणांस पहाता येऊ शकेल.
4. आपल्या आवडीच्या शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका वाचून आपल्या शहरातील जवळच्या अभ्यासकेंद्राला भेट द्यावी. अभ्यासकेंद्रावर आपणांस आवश्यक असलेली माहिती मिळाल्यानंतर आणि प्रवेशाबाबत आपले समाधान झाल्यानंतरच आपणास ऑनलाईन प्रवेश करता येऊ शकेल.
5. विद्यापीठाच्या होमपेजवर ऑनलाईन प्रवेश शैक्षणिक सत्र 2016-17 साठी ह्या ठिकाणी जाऊन त्यावर क्लिक करा. ह्यानंतर आपणांस पुढीलप्रमाणे स्वंतत्रपणे (बॉक्स) लिंक असतील.
   - 5.1 नव्याने प्रवेश करणाऱ्या आणि कायमनोंदणी क्रमांक नसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीपहिल्या बॉक्समध्ये जाऊन प्रवेश करता येईल.
   - 5.2 कायमनोंदणी क्रमांक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुढील वर्षाचा प्रवेश करण्यासाठी दुसरा बॉक्स असेल त्यावर जाऊन प्रवेश करता येईल.
6. उपरोक्त 5.1 नुसार ऑनलाईनला प्रवेश करताना आपणांस प्रथमतः OTP मिळतो. सदरचा OTP आपल्या मोबाईल आणि ई-मेलवर येतो त्यानुसार पुढील माहिती भरून प्रवेश करता येऊ शकतो.
7. उपरोक्त 5.2 नुसार प्रवेश करताना विद्यार्थ्याला यापूर्वी मिळालेला कायमनोंदणी क्रमांक हा आपला युजर आयडी असेल आणि पासवर्ड आपण मागील वर्षी वापरल्यानुसारच आपली प्रोफाईल उघडली जाईल, त्यानंतरच प्रवेश करता येईल.

8. आपला युजरआयडी व पासवर्डन्वये प्रवेश करता आला नाही तर विद्यापीठाशी संपर्क करूनच आपला प्रवेश करावयाचा आहे. अन्यथा आपला प्रवेश चुकू शकतो. त्यामुळे प्रवेश करताना काळजी घ्यावी.
9. कायमनोंदणी क्रमांक असणाऱ्या विद्यार्थ्यांनी नव्याने प्रवेश केल्यास त्यांच्या प्रवेशात अडचण येऊ शकते त्याचप्रमाणे पुढे निकालातही अडचण येणार आहे.
10. ऑनलाईन प्रवेश करताना आपल्या प्रोफाईलमधील माहिती काळजीपूर्वक वाचून भरा. त्यातील आपले संपूर्ण मराठी व इंग्रजी नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी या गोष्टी काळजीपूर्वक भराव्यात. ह्यात चुका होणार नाही याची काळजी घ्या.
11. प्रवेशाच्या वेळी प्रोफाईलमध्ये टाकलेला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत बदलता येणार नाही. जर वारंवार बदल केला तर आपणांस येणारे दूरध्वनीवरील मेसेज अथवा ई-मेल विद्यापीठाकडून मिळणार नाही.
12. आपल्या प्रोफाईलन्वये आपणांस परीक्षा प्रवेश पत्र, गुणपत्रक, पासिंग सर्टिफिकेट, पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळणार आहे. त्याचप्रमाणे आपल्या नोंदणीकृत घरच्या पत्त्यावर येणार आहेत. तसेच विद्यापीठातर्फे विविध प्रकारचे एसएमएस आपणास पाठविण्यात येणार असल्याने मोबाईल क्रमांक एकच ठेवावा वारंवार त्यात बदल करू नये. त्यामुळे उपरोक्त 10 क्रमांकातील माहिती काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.
13. ऑनलाईन प्रवेश करताना प्रोफाईल सोबतच शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, आपला स्वतःचा फोटो, स्वाक्षरी अचूक स्कॅन करणे आवश्यक आहे. स्कॅन कशा स्वरूपाचे असावे ह्याबाबत संबंधित ठिकाणी सूचना दिलेल्या आहेत.
14. इलिजिबीलीटी करताना कागदपत्रे अपूर्ण अथवा चुकीची असल्यास प्रवेश नाकारण्यात येतो त्यामुळे आपल्या प्रवेशासाठी असलेली कागदपत्रे संबंधित ठिकाणी काळजीपूर्वक स्कॅन करून टाकावी.
15. शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रांअभावी अथवा शुल्काअभावी प्रवेश अपात्र झाल्यास तात्काळ आपल्या मोबाईलवर एसएमएस पाठविण्यात येत असतो त्यामुळे विद्यापीठाकडून आलेल्या एसएमएस अथवा ई-मेलवर लक्ष ठेवावे.
16. शिक्षणक्रमनिहाय विषय/अभ्यासक्रम निवड करताना माहितीपुस्तिकेतील आधार घेणे आवश्यक आहे. प्रवेशानंतर कायम केल्यानंतर विषय बदल शक्यतो करण्यात येऊ नये.
17. अभ्याकेंद्र बदल, माध्यम बदल, शिक्षणक्रम बदल इत्यादी आपणांस करता येणार नाही. त्यामुळे प्रवेश करताना ऑनलाईनमधील मराठी व इंग्रजी सूचना काळजीपूर्वक वाचूनच प्रवेश करणे अपेक्षित आहे.
18. प्रवेश शुल्क भरताना विद्यापीठ हिस्सा व अभ्यासकेंद्र हिस्सा एकत्रितपणे ऑनलाईनच बँकींगन्वये (नेट बँकींग)भरावयाचे आहे. ऑनलाईन व्यतिरिक्त कोणत्याही स्वरूपात प्रवेश शुल्क स्विकारले जाणार नाही याची नोंद प्रवेश करताना घ्यावयाची आहे.
19. प्रवेश शुल्क ऑनलाईन भरताना विद्यापीठाने दिलेल्या सूचनांप्रमाणे प्रवेश शुल्क भरावेत, तांत्रिक अडचण आल्यास थोडे थांबून पुन्हा प्रयत्न करावा जास्त घाई करून शुल्क डबल भरू नका. त्यामुळे परतावा करणे अवघड होते.
20. ऑनलाईन प्रवेश केल्यानंतर आपल्याकडे ऑनलाईन प्रवेश अर्जाची व बँक चलनाची प्रिंट काढून ठेवणे आवश्यक आहे.
21. आपला प्रवेश इलिजिबीलीटी विभागामार्फत पात्र झाल्यानंतर आपणांस आलेल्या एसएमएसनुसार आपली प्रोफाईल तपासून पहावी. त्यात दुरूस्ती असल्यास आपणांस विद्यापीठाच्या धोरणानुसार प्रकिया शुल्क रूपये 300/-चा धनाकर्ष विनंती अर्जासह विद्यापीठाला पाठवून दुरूस्ती करावी लागणार आहे.

22. प्रोफाईलमध्ये काही दुरूस्ती असल्यास विद्यापीठातर्फे संकेतस्थळावर दिलेले नोटिफिकेशन वेळोवेळी तपासून घ्यावे व त्यानुसार कार्यवाही वेळेत करणे आपणांवर बंधनकारक असेल.
23. प्रवेशासंबंधी काही या व्यतिरिक्त अडचण आल्यास आपल्या जवळच्या अभ्यासकेंद्राशी, विभागीय केंद्रांशी अथवा विद्यापीठाच्या नोंदणी कक्षाशी (**0253-2230580**, **2230734**) संपर्क करावा. तसेच nondani@ycmou.digitaluniversity.acह्या मेलवर आपली अडचण कळवू शकता.

आपणाकडून सहकार्याची अपेक्षा !कळावे.

आपलाविश्वासू,

**प्रा.(डॉ.)अर्जुन घाटुळे,**
***परीक्षा नियंत्रक***

प्रतमाहितीसाठी-1.मा.कुलगुरू,यचममुविद्यापीठ,नाशिक